सरकार पक्षातर्फे फिर्यादी साक्षीदार क्र. १ जबानी :—

मी याव्दारे शपथेवर कथन करते की —

माझे नांव :— रुपाली विजय वराडे
वय :— ४१ वर्षे, धंदा :— नोकरी,
राहणार :— सध्या एकता को.ऑप. सोसायटी, थरमॅक्स चौक, संभाजी नगर, चिंचवड, पुणे.

**<u>आज दिनांक ०२/०२/२०२३ रोजी फिर्यादीचा उर्वरित उलटतपास आरोपीचे विधीज्ञ श्रीमती एस.ए.आंधळकर यांचेतर्फे शपथेवर सुरू</u>.**

१८. आरोपी हे पैशाचे लालची असल्याचे मी खोटे सांगते हे म्हणणे खरे नाही. मी एकता को.ऑपरेटिव्ह चिंचवड येथे आरोपी क्र. १ सोबत १ महिना २ दिवस राहिले होते. त्यावेळी मी नोकरीला जात होते. त्यावेळी माझा मुलगा दहा महिन्याचा होता. मी आरोपी क्र. १ सोबत वेगळी राहत असतांना सात दिवस सुट्टी काढुन मी माझे दहा महिन्याच मुलाचा सांभाळ केला व नंतर आरोपी क्र. २ व ३ हे घरी परत आल्याने मी परत नोकरीस जात होते. आम्ही राहत असलेल्या इमरातीत राहण्या—या दोन महिला पाळणाघर चालवित असल्याचे सांगितले होते. त्यांना एक मुल एक महिना सांभाळण्यासाठी रुपये ३०००/— लागतात असे सांगितले होते. त्या महिलेपैकी एक महिलेचे काकु कदम काकु व दुस—या महिलीचे नाव मला माहित नाही. मी मुलाला सांभाळ करण्यासाठी पाळणा घराची चौकशी केल्याचे खोटे सांगते हे म्हणणे खरे नाही. मी आरोपी क्र. २ व ३ यांना मुलगा सांभाळण्यासाठी बोलावुन घेतले होते हे म्हणणे खरे आहे. तसे मला आरोपी क्र. १ ने तसे करायला सांगितले होते. आरोपी क. १ यांच्या सांगण्यावरुन मुलगा सांभाळण्यासाठी मी आरोपी क्र. २ व ३ यांना बोलावल्याचे मी खोटे सांगते हे म्हणणे खरे नाही.

१९. आरोपी क्र. १ ते ३ यांनी मला शिवीगाळ करणे, तुझे चरित्र चांगले नाही, लग्नामध्ये तुझया आईवडिलांनी मानपान केला नाही या कारणांवरुन शिवीगाळ व मारहाण केली हे मी खोटे सांगते हे म्हणणे खरे

नाही. तसेच आरोपी क्र. २ ने आरोपी क्र. १ यांना सांगत असे की “तु तुझे मुलामध्ये जिव ठेवु नको आम्ही तुझे दुसरे लग्न लावुन देतो व तुझया पत्नीचे ती आपल्या उंबर—याच्या आत असलयाने तिचे जिवाचे तुकडे करुन टाक” असे म्हणत असे हे मी खोटे सांगते हे म्हणणे खरे नाही. तसेच त्यांनतर लगेचच काही दिवसांनी तेथे आमचेकडे आरोपी क्र. ४ ते ६ आले, तसेच त्यांनीदेखील वरील सर्व कारणांसाठी जसे की माझे चरित्र चांगले नाही, माझे आईवडिलांनी त्यांचा लग्नामध्ये मानपान केला नाही, मला काही येत नाही असे कारणांवरुन टोचुन बोलुन शिवीगाळ करण्यास सुरुवात केली तसेच ते सर्व खुप घाणेरडया शब्दात बोलुन शिवीगाळ करत होते ते शब्द मी येथे बोलुन दाखवु शकत नाही तसेच त्यानंतर माझे काम सुरु होते. त्यादरम्यान मी व मुलगा तेथे आरोपींसोबत एक महिना राहिले हे मी खोटे सांगते हे म्हणणे खरे नाही.

**२०.** आरोपी क्र. २ व ३ हे आमचेसोबत राहत असतांना मी स्वयपांक करित असे. मी जॉब वरुन देखील आल्यानंतरदेखील आरोपी क्र. १ ते ३ हे मला उपासी ठेवत, जेवायला देत नसत व मारहाण करित असत. तसेच ते माझे मुलाची काळजी घेत नसत हे मी खोटे सांगते हे म्हणणे खरे नाही. तसेच आरोपी क्र. १ ते ३ हे मला “तु इथे राहु नकोस, तुझा आमचा संबंध नाही” असे म्हणुन डांबुन ठेवत असत हे मी खोटे सांगते हे म्हणणे खरे नाही. असा कोणताही प्रसंग न घडल्यामुळे सदरील प्रसंगाच्या तारखा मी माझया सरतपासात सांगितलेल्या नाही हे म्हणणे खरे नाही.

**२१.** माझे आईवडिलांना व भावाने आरोपींना समजावुन सांगण्याचा प्रयत्न केला असता आरोपींनी त्यांचे काहीही न ऐकता त्यांनाच शिवीगाळ करुन मारहाण केल्याची घटना दि. १२ व १३ फेब्रुवारी, २०११ रोजी घडली होती. त्यादिवशी आमचे घरी माझे आई व दोन भाउ आले होते. त्यावेळी घरी आरोपी क्र. १ व २ हजर होते. माझे दोन्ही भांवानी आरोपी क्र. १ ला सदरच्या दिवशी बेशुध्द होईपर्यत मारहाण केली हे म्हणणे खरे नाही. मी व माझे आईने आरोपी क्र. २ यांना त्यादिवशी

बेदम मारहाण केली होती हे म्हणणे खरे नाही. त्यादिवशीच्या भांडणानंतर मी माझे कपडे घेउन माहेरी निघुन गेले होते हे म्हणणे खरे आहे.

**२२.** त्यानंतर मी जुलै २०१७ मध्ये माझे नव—याची चौकशी करणेकामी त्याचे घरी गेले होते हे म्हणणे खरे आहे. साक्षीदार स्वत:सांगते की आरोपी क्र. १ आमचे प्रकरणात हजेरी लावत नसल्याने त्यासाठी मी चौकशी करण्यासाठी गेले होते.

**२३.** सन २०११ सालापासुन ते आजपर्यंत आरोपी क्र. १ हा मला न्यायालयाच्या कामकाजा व्यतिरीक्त न्यायालय परिसर सोडुन इतर कोठेही काहीही बोललेला नाही हे म्हणणे खरे आहे.

**२४.** आरोपी क्र. १ हे लष्कर न्यायालयात व शिवाजी नगर न्यायालयात हजर राहत नसल्याने मी ऑगष्ट २०१७ मध्ये थरमॅक्स चौकातील आरोपीच्या घरी आले हे मी खोट सांगत आहे हे म्हणणे खरे नाही. साक्षीदार स्वत: सांगते की ऑगस्ट २०१७ ऐवजी जुलै २०१७ मध्ये थरमॅक्स चौकातील आरोपीच्या घरी आले होते. तेथे मला कळाले की आरोपीसोबत त्याची दुसरी पत्नी व मुलगा तेथे राहत आहे तसेच तेथे मी आरोपी क्र. . १यांना सदर प्रकारची विचारपुस केली असता मी घरी का आले या कारणांवरुन मारहाण केली तसेच त्यामुळे मी १०० नंबर वर फोन केला होता हे मी खोटे सांगत आहे हे म्हणणे खरे नाही.

**आरोपीचे विधीज्ञ यांच्या विनंती वरुन उर्वरीत फिर्यादीचा उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.**

फेरतपास नाही.

वा.दा.ब.अ.क.केले

—समक्ष—

Ravi Magan Giri Digitally signed by Ravi Magan Giri Date: 2023.02.03 18:49:33 +0530

**( र. म. गिरी )**
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
पिंपरी, पुणे.
दि. ०२.०२.२०२३.

Ravi Magan Giri Digitally signed by Ravi Magan Giri Date: 2023.02.03 18:49:38 +0530

**( र. म. गिरी )**
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
पिंपरी, पुणे.

**– प्रमाणपत्र –**

मी, प्रमाणित करतो की, सदर पी.डी.एफ.संचिकेच्या मजकुरातील शब्द न शब्द मुळ न्यायनिर्णय/आदेशाप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नांव | : श्रीमती किर्ती उदय पवार |
| न्यायालयाचे नांव | : श्री. र. म. गिरी न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,<br>पिंपरी पुणे. |
| न्यायनिर्णयाचे /ओदशाचे दिनांक | :०२/०२/२०२२. |
| न्यायीक अधिकाऱ्यांनी सही केल्याचे दिनांक | :०३/०२/२०२२. |
| पी.डी.एफ.फाईल अपलोड केल्याचा दिनांक | : ०३/०२/२०२२. |

स्वाक्षरीत/–

लघुलेखक(श्रेणी–iii)